दैनिक विदर्भ सत्यजीत
Title Code - MAHMAR - 52680
E-Paper: www.vidharbhsatyajeet.in
प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख | मुख्य संपादक :– उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111/9921746611 | कार्यकारी संपादक योगेश सौभागे
बुलढाणा वर्ष २, अंक ३३९ बुधवार दि- १९ मार्च २०२५, पाने ४ , किंमत ३ रुपये

# प्रा. डॉ. गजानन घायाळ याना भारत सरकार कडून १६ लक्ष रुपये मंजूर



## शोध प्रकल्पासाठी आयसीएसएसआर भारत सरकारकडून मंजूर




जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर येथील ग्रंथालय प्रमुख तथा ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. गजानन घायाळ यांना महाराष्ट्रातील आयुर्वेदीक महाविद्यालयातील ग्रंथालयात ई संसाधनाचा वापर या विषयातील शोध प्रकल्पासाठी भारतीय सामाजिक विज्ञान व अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्याकडून १६ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रा डॉ घायाळ यांचे कौतूक केले आहे. प्रा. डॉ. घायाळ हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयाचे संशोधक मार्गदर्शक असुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थी संशोधनाचे कार्य करीत आहेत. त्यापैकी दोन विद्यार्थ्यांना सारथी अन् बार्टी या संस्थेकडून दहा लक्ष रुपये शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. प्रा. डॉ. गजानन घायाळ हे राज्यातील आणि बाह्य राज्यात अनेक विद्यापीठाचे पीचडी.चे बाह्य परिक्षक देखिल आहेत. यासोबतच, ते अमरावती विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्यरत आहेत. विविध सामाजिक शैक्षणिक संघटनांचे ते पदाधिकारी आहेत. सोनुना ग्रामसेवा सहकारी सोसायटीचे ते दहा वर्षांपासून अध्यक्ष आहेत.प्रा. डॉ. गजानन घायाळ हे 'मेजर रिसर्च प्रोजेक्ट'साठी निवड झालेले यावर्षीचे अमरावती विद्यापीठातील एकमेव व्यक्ती असून या अगोदरसुद्धा त्यांना विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून लघुशोध प्रबंधासाठी २०१३ मध्ये एक लक्ष ६० रुपये अनुदान मिळाले होते . ते यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक म्हणून मागील दहा वर्षांपासून काम पाहत आहेत. तसेच, त्यांना आदर्श विभागिय केंद्र संयोजक म्हणून २०२३ चा पुरस्कार देखिल मिळालेला आहे. या त्यांच्या यशा बद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव साहेब,ध.दि.रहाटे शिक्षणसंस्थेचे सचिव ऋषी जाधव, प्रा. डॉ. सचिन जाधव, सिंधूताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बालाजी लाहोरकर, अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. संतोष कुटे यांनी प्रा. डॉ. घायाळ यांचे अभिनंदन करुन पुढील संशोधनासाठी शुभेच्या दिल्या आहे.



# स्व . अनासाहेब देशमुख यांची - ४ ७ वी पुण्यतीथी साजरी




सिंदखेड राजा खास बातमीदुसरबीड येथे जीजामाता सहकारी साखर कारखाना चे संस्थापकीय अध्यक्ष स्व अनासाहेब देशमुख यानी त्या काळा मधील परीसरा मधील शेतकर्यांचा विकास व्हावा या साठी जीजामाता सह . साखर कारखाना सुरु केला दिनांक १८ मार्च रोजी स्व . अनासाहेब देशमुख यांची ४ ७ वी पुण्यतीथी जिजामाता ग्रीन शुगर मिल चे प्रांगणात पुण्यतीथी साजरी करण्यात आली या वेळी ' जीजामाता ग्रिन शुगर मिलचे उपाध्यक्ष राजे गणेशराव जाधव मा . आमदार श्री तोतारामजी कायंदे श्री डी डी देशमुख श्री उत्तमराव जी देशमुख . श्री विलासराव पवार श्री अत्माराम शेळके डॉ. शिवाजीराव खरात श्री टी एन मोगल प्रा . दिलीपराव नायकवाड श्री गजानन अघाव श्री विश्वासराव देशमुख श्री अबासाहेब राजे भोसले की डहाळके श्री गोविंद राठोड श्री स्वपनील आवस्थी . शेख अजहर श्री मिलींद देशमुख श्री रामदास नागरे श्री सुर ज



कुटे तसेच पत्रकार बांधव उपस्थीत होते

# कंटेनर मधुन जनावरांची तस्करी : तीन आरोपींना अटक ; ६० गोवंशाची सुटका




पांढरकवडा :उपविभागात गोवंश तस्करीविरोधात मोठी कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळच्या पथकाने अवैधरीत्या कत्तलीसाठी गोवंश वाहतूक करणाऱ्या तिघांना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल ६० गोवंश (बैल) आणि एक कंटेनरसह एकूण ४५ लाख ५ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई १७ मार्च २०२५ रोजी करण्यात आली. गोपनीय माहितीवरुन टाकला सापळा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १७ मार्च रोजी पांढरकवडा उपविभागातील अवैध धंद्यांविरुद्ध आणि उघड गुन्ह्यांचे अन्वेषण करण्याच्या दृष्टीने गस्त घालत असताना पथकाला खात्रीलायक गोपनीय माहिती मिळाली. नागपूर येथून एक कंटेनर वाहनातून गोवंशीय बैल कत्तलीसाठी पांढरकवडा मार्गे हैदराबाद येथे वाहतूक होणार असल्याचे समजले. ही माहिती मिळताच पथकाने तातडीने पंचासह पांढरकवडा पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरी गावाजवळ सापळा लावला. काही वेळातच नागपूरकडून संशयास्पदरीत्या येणारा कंटेनर क्र. टी एस ०७ यु ई ५०२१ दिसताच पोलिसांनी त्याला थांबवले. वाहनाची पाहणी केली असता त्यात कोंबून ठेवलेले ६० गोवंशीय बैल आढळून आले. आरोपींची नावे आणि अटक वाहनातील तिघांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी बैल हैद्राबाद येथे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे संतोष भरलाल लोधा वय ५१ वर्ष, रा. फुलपुरा, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश मशीद अली रशीद अली २८ वर्ष, रा. दांडीयावाडी, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश शाकीर अली अमानत अली ५० वर्ष,




रा. दांडीयावाडी, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्तपोलिसांनी पंचासमक्ष वाहनाची आणि आरोपींची झडती घेतली असता खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला:तीन मोबाईल फोन किंमत अंदाजे ३,००० रुपयेरोख रक्कम २,२०० रुपये ६० गोवंश बैल किंमत अंदाजे १५,००,००० रुपयेकंटेनर वाहन किंमत अंदाजे ३०,००,००० रुपये)असा एकूण ४५,०५,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कायदेशीर कारवाई या प्रकरणी आरोपींविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला असून आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, तसेच स्थानीय गुन्हे शाखा यवतमाळचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान सहायक पोलीस निरीक्षक अजयकुमार वाढवे, पोउपनि धनराज हाके, पोलीस अंमलदार सुनिल खंडागळे, उल्हास कुरकुटे, सुधीर पांडे, निलेश निमकर, रजनीकांत मडावी, सलमान शेख, सतिश फुके यांनी परिश्रम घेऊन ही मोठी कारवाई यशस्वीरित्या पूर्ण केली. पुढील तपास सुरु सध्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ पोलीस करीत आहेत. या कारवाईमुळे गोवंश तस्करी करणाऱ्या टोळक्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे विविध मागण्यांसाठी आंदोलन




राहाता: राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध समस्या आणि आश्वासित मागण्यांवर शासनाकडून कोणताही निर्णय होत नसल्याने राज्यभरासह राहाता तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेकडून राहाता तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन संघाकडून शासनाकडे वारंवार मागण्या मांडूनही त्या प्रलंबित आहेत. या धर्तीवर राज्यभरातील सर्व तहसीलदार यांना निवेदने देऊन आंदोलन करण्यात आले. यावेळी अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सोपानराव कदम, सचिव सुनील गोरे व महासंघाच्या मार्गदर्शनाखाली राहाता तालुकाध्यक्ष डॉ. शरद दुधाट, सचिव श्याम जगताप, संजय ठाकरे, जवाहरलाल पांडे, अरुण कुळसुंदर, रणजीत पाटील आदींसह इतर शिक्षकांनी राहाता नायब तहसीलदार एच.जी. पाटील यांना निवेदन दिले. या मागण्यांमध्ये आयटी शिक्षकांचे समायोजन, अनुदान प्राप्त शिक्षकांना वाढीव टप्पा देणे, सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना, शाळा संहितेनुसार विद्यार्थी संख्येचे निकष पाळणे, सन २००५ पूर्वी अर्धवेळ व नंतरच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, वाढीव पदांचे समायोजन करणे, शिक्षकांच्या निवृत्तीचे वय ६० करणे, तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे, उपप्राचार्यांना पदोन्नती वेतन वाढ देणे, अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ होताना अर्धवेळ सेवेची वेतनवाढ देणे, अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बंद करणे, शिक्षकांची रिक्त पदे भरणे, शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नये, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार दूर




करण्यात यावा, एम.फील, पीएच.डी. धारक शिक्षकांना वेतनवाढ मिळावी, डीसीपीएस व एनपीएस धारक शिक्षकांना हिशेब व देय रक्कम देण्यात यावी अशा विविध मागण्यांसाठी ही निवेदने देण्यात आली आहेत.वृत्त प्रसिद्धी सहयोगसमता मीडिया सर्व्हिसेस श्रीरामपूर – १५६११७४१११

दैनिक विदर्भ सत्यजीत महाराष्ट्र देशा

# जिल्हास्तरीय भजन स्पर्धेत ब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळास ५०००/- चे पारितोषिक

## ब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळ सदस्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव




निफाड नाशिक प्रतिनिधीश्रीक्षेत्र मोहाडी तालुका दिंडोरी येथे कर्मयोगी एकनाथ भाऊ जाधव यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हास्तरीय भव्य वारकरी सांप्रदायिक भजन स्पर्धेचे आयोजन कर्मयोगी कै. एकनाथ (भाऊ) जयराम जाधव सभागृह मोहाडी तालुका दिंडोरी जि. नाशिक येथे करण्यात आले होते. या भजन स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातील अनेक भजनी मंडळांनी सहभाग नोंदविला होता. जिल्हास्तरीय भव्य वारकरी सांप्रदायिक भजन स्पर्धेत सहभागी भजनी मंडळाने एक अभंग व एक गवळण निर्धारित वेळेत सादर करावयाची होती. धर्माचार्य हभप एकनाथ महाराज सदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आलेल्या मनमाड येथील ब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळानेही सहभाग नोंदवला होता. या भजन स्पर्धेमध्ये मनमाड येथील




भजनी मंडळाने उत्कृष्ट अभंग व गवळण सादर केल्यामुळे परीक्षक मुकुंद बापू पाटील, प्रवीण जाधव, प्रदीप जाधव, दिलीप पागेरे, पंकज जाधव यांनी निपक्षपातीपणे परीक्षण करून मनमाड येथील ब्रह्म चित कला महिला भजनी मंडळात प्रथम क्रमांकाचे उत्तेजनार्थ पारितोषिकाचे मानकरी म्हणून घोषित केले. जिल्हास्तरीय वारकरी सांप्रदायिक भजन प्रथम विजयी संघास १५000/- रुपये, द्वितीय विजय संघास ११000 /- रुपये




,तृतीय विजयी संघास ७000/- रुपये व प्रथम उत्तेजनार्थ ५000/- रुपये, द्वितीय उत्तेजनार्थ २१00/- रुपये, तृतीय उत्तेजनार्थ ११00/- रुपये अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. ब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळाच्या उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी सौ सविता माई अशोकराव पगार,सौ आरती ताई दखने ,सौ गिताताई संजय गवळी, सौ योगिता पाटील जगताप, सौ सविता हरीष शिंदे,सौ सारिका ताई ठोंबरे यांनी उत्कृष्ट गायनाची, मृदंगाचार्य अर्जुन महाराज गांगुर्डे, हार्मोनियम वादक म्हणून बापू महाराज साथ संगत केली होती.ब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळाने जिद्द,चिकाटी,साहस, मेहनत व साधत हे यश मिळविले आहे. या भजनी मंडळांनी उत्कृष्ट अभंग व गवळण सादर केल्याबद्दल परीक्षकांनी व उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्यांना दाद दिली. या यशाबद्दलब्रम्हचित्कला महिला भजनी मंडळाचे आधारस्तंभ व मार्गदर्शक धर्माचार्य हभप एकनाथ महाराज सदगीर ठाणे यांच्या सह वारकरी संप्रदायातील सर्व मान्यवर मंडळींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण लेखक वामन राऊत यांच्या चिराखाणी

## आत्मचरित्राचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन




नाशिक ननाशी येथील सेवानिवृत्त शिक्षण विस्तारअधिकारी तथा ग्रामीण लेखक वामन राऊत यांचे आत्मचरित्र असलेल्या चिराखाणी या पुस्तकाचे प्रकाशन नाशिक येथील गणाधीश बँकवेट हॉल येथे मान्यवरांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या पुस्तकाचे प्रकाशन अन्न आणि औषध प्रशासनचे विशेष कार्य अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ,वैशाली प्रकाशन पूणेचे विलास पोतदार,आदिवासी साहित्य आणि संस्कृती अभ्यासक प्रा.डॉ.मधुचंद्र भुसारे,बिरसा मुंडा मेडिकल हब नाशिकचे संस्थापक डॉ.साहेबराव झिरवाळ,सुप्रसिद्ध कवी प्रशांत केंदळे आदिंच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लेखक वामन राऊत यांनी आदिवासी विकास विभागात शिक्षक म्हणून केलेल्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक करून चिराखाणी या वामन राऊत यांच्या आत्मचरित्रात ग्रामीण आदिवासी भागात काम करणाऱ्या सर्व सामान्य माणसाचे जीवनचरित्र रेखाटले असल्याचे सांगितले.तसेच लेखक वामन राऊत यांनी आदिवासी भागात काम करताना आलेले विविध अनुभव अडचणी आणि त्यातून मार्ग काढत विद्यार्थ्यांचा साधलेला सर्वांगीण शैक्षणिक विकास यावर मनोगत व्यक्त केले.तसेच या शैक्षणिक कार्यातूनच आत्मचरित्र लिहून ते प्रकाशित करण्याची प्रेरणा मिळून आज हे आत्मचरित्र प्रकाशित




झाल्याने मनस्वी समाधान मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दशरथ भोये यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोनाली राऊत,प्रतिभा राऊत,छाया राऊत,संजना झिरवाळ,ललित राऊत,प्रशांत राऊत आदिनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ग्रामीण लेखक साहित्यिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक विदर्भ सत्यजीत विदर्भ देश

# पत्रकारितेसह सामाजिक क्षेत्रात परोपकारी व्यक्तीमत्व असलेले पत्रकार विष्णूभाऊ राऊत



अमरावती जिल्ह्याच्या जरूड येथील मनमिळावू, सुस्वभावी, सर्व समावेशक, जात-धर्म-पंथ पक्ष लिंग कुठल्याही प्रकारचा भेदाभेद न करणारा, शिव फुले शाहू-आंबेडकरी विचारधारेचा खंदा पुरस्कर्ता आणि निःपक्षपाती पत्रकारिता करणारा एक प्रामाणिक व सच्चा वार्ताहर म्हणजे आमचे मित्र विष्णू राऊत होय.विष्णू भाऊ अगदी तरुण वयापासूनच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळीमध्ये सक्रिय राहिलेले परोपकारी व्यक्तिमत्व आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी विविध चळवळी केल्या, गावातील नागरिकांच्या समस्या शासकीय व प्रशासकीय स्तरावर सोडविण्यासाठी वेळप्रसंगी अधिकाऱ्यांशी व पदाधिकाऱ्यांशी घनघोर चर्चा करून जनसामान्याचे प्रश्न अगदी पोट तिडके ने मांडून सोडविण्याचा सतत प्रयत्न विष्णू राऊत यांनी केलेला आहे१० च्या दशकामध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी व कार्यप्रणालीशी प्रभावित होऊन विष्णू भाऊ यांनी शिवसेना पक्ष जवळ केला आणि शिवसेना पक्षाची विचारधारा आपल्या तरुण सवंगड्यांना सांगून अनेक शिवसैनिक त्यांनी जोडलेत, त्यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक जास्त महत्त्व दिले, छत्रपती शिवरायांची जयंती अगदी मोठ्या प्रमाणावर पहिल्यांदा जरूड परिसरामध्ये विष्णू भाऊ राऊत यांनी सुरु केली ज्याचा साक्षीदार मी स्वतः आहे १९९७ साली जरूडयेथील गुजरी बाजारामध्ये भव्य शिवजयंतीचा कार्यक्रम विष्णूजी आणि त्यांचे सवंगडी शिवसैनिक यांनी साजरा केला, ज्यामध्ये मी प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होतो. त्यानंतर ग्राहक चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन असे अनेक कार्यक्रम व उपक्रम विष्णू भाऊ राऊत यांनी राबविलेत, वार्ताहरशिप करत असताना आपल्यावर पक्षपातीपणाचा आरोप लागणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली, आपल्या जीवननिर्वाहासाठी त्यांनी बस स्टँडवर एक छोटेसे जीवनावश्यक वस्तूंचे दुकान थाटले त्या ठिकाणी वर्तमानपत्रांची विक्री आणि येणाऱ्या जाणाऱ्यांच्या भेटीगाठी व चर्चा त्यांनी सुरु केल्या, त्यांनी आपल्या स्वतःचं एक जनसंपर्क कार्यालयात त्याठिकाणी जणू सुरु केलं, मी सुरुवातीलाच हजारात शत्रू वार्ताहर असं म्हटलेलं आहे, त्याचं कारणही तसंच आहे विष्णू भाऊंच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये सर्वच पक्षाचे, सर्वच विचारधारेचे, सर्वच क्षेत्रातील गणमान्य पासून तर सामान्यांपर्यंत माणसं सकाळला आणि सायंकाळला एकत्रित बसतात आणि माणूस समाज गाव राज्य व राष्ट्रीय पातळीच्या चर्चा त्या ठिकाणी घडवून येतात, सर्वांचे मैत्री राहावी यासाठी त्यांनी जवळपास १०० तरुणांचा एक अभिनव मित्र परिवार म्हणून संच किंवा मंडळ त्यांनी स्थापन केलं, त्यांच्या जीवनकार्यातील एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या मित्र मंडळातील सर्वच सदस्यांचा मोठ्या हिरीरीने व उत्साहाने वाढदिवस साजरा करतात, तरुण मुलांना बोलता यावं, भाषण देता यावं म्हणून त्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात किमान २० ते २५ लोकांना एक एक दोन दोन मिनिटं का असेना बोलायला लावतात म्हणजे बोलणारा माणूस चळवळ चळवळीत सहभागी होणारा माणूस समाजकार्यात धडपडीने भाग घेणारा माणूस घडावा ही त्यांची महत्त्वाकांक्षी योजना आहे त्यांचा १८ मार्च हा त्यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या शुभ प्रसंगावर नेत्यांना हार्दिक शुभेच्छा देतो त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आयुरारोग्य लाभो व दीर्घ आयुष्य लाभो ही सदिच्छा व्यक्त करतो आणि या अजातशत्रूला त्याच्या कार्यामध्ये सदैव यश मिळत राहो अशी देखील सदिच्छा व्यक्त करता

**`.संकलन - सी.टी. पठाणसेवानिवृत्त उपमुख्याध्यापक जरुडलेख प्रसिद्धी सहयोगसमता मीडिया सर्व्हिसेस श्रीरामपूर ९५६११७४१११**



# ननाशीत २० मार्च पासून अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन




नाशिक ननाशी येथे २० मार्च ते २७ मार्च पर्यंत अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताह काळामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये नाम महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आपली हरिकीर्तने करणार आहे. याशिवाय दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,४ ते ६ ज्ञानेश्वरी पारायण,ज्ञानेश्वरी प्रवचन ६ ते ७ हरिपाठ व रात्री ९ ते ११ हरी किर्तन होणार असून यामध्ये ह.भ.प.उमाकांत महाराज शिंदे ह.भ.प.अक्षय महाराज पवार ह.भ.प.माणिक महाराज राऊत ह.भ.प.संजय महाराज शिंदे ह.भ.प.अश्विनीताई म्हात्रे ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख ह. भ. प. गणेश महाराज शिंदे, तसेच रात्री ११ वाजेनंतर भारुडांचा कार्यक्रम होणार आहे.यामध्ये दि.२० रोजी वक्रतुंड भारुडकार मंडळ (रोंघाणे) दि. २१ रोजी जय बजरंग बली भारुड मंडळ ( वडबारी) दि.२२ रोजी जय बजरंग बली मंडळ (अंबाडे) दि.२३ रोजी जय जनार्दन भारुड मंडळ(खीरकाडे) दि.२४ रोजी नटरंग भारुड मंडळ ( खोबळा) दि.२५ रोजी जनजागृती मंडळ (देवाची आळंदी) ही मंडळे भारुडाचा कार्यक्रम करणार आहे तर या सप्ताहाची सांगता ह.भ.प.गणेश महाराज शिंदे यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे तरी या हरिकीर्तनांचा व भारुडाच्या कार्यक्रम श्रवणाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आव्हान समस्त ननाशी ग्रामस्थांनी केले आहे.



दैनिक विदर्भ सत्यजीत वृत्तासार

# लासलगांव ग्रा पं पगारदार कर्मचारी सह.पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बाबासाहेब गिते

## उपाध्यक्षपदी तानाजी जगताप यांची बिनविरोध निवड




निफाड नाशिक प्रतिनिधीलासलगांव ग्रामपंचायत पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदासाठी आज झालेल्या निवडणुकीत येथील श्री. बाबासाहेब माणिकराव गिते यांची तर उपाध्यक्षपदी श्री.तानाजी हरिभाऊ जगताप यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी श्री.बाबासाहेब गिते यांची निवड झाल्यामुळे कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. लासलगांव ग्रामपंचायत पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सन २०२५-२०३० या कालावधीसाठी ची पंचवार्षिक निवडणुक २५ फेब्रुवारी २०२५ मध्ये संपन्न झाली होती. या निवडणुकीमध्ये निवडुन आलेल्या सभासदांमधुन अध्यक्ष पदासाठी श्री.बाबासाहेब गिते यांचा तर व्हा.चेअरमन पदासाठी श्री.तानाजी जगताप यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. चेअरमन पदासाठी बाबासाहेब गिते यांच्या फॉर्मवर सुचक रोशन गायकर अनुमोदक मंगेश अहिरे तर व्हा.चेअरमनपदासाठी तानाजी जगताप यांच्या अर्जावर सुचक रुपेश पवार तर अनुमोदक चेतन सानप यांनी स्वाक्षरी केल्या. यांनी दिले तर या वेळी निवडणूक अधिकारी म्हणुन श्री.निळकंठ सावंत यांनी काम पाहिले. चेअरमन आणि व्हा.चेअरमन पदाची निवडणुक ग्रामपंचायत लासलगांव च्या कार्यालयामध्ये घेण्यात आली. चेअरमनपदी निवड झाल्यानंतर श्री.बाबासाहेब गिते यांनी सर्व संचालकांना विश्वासात घेऊन सभासदांच्या हिताचे निर्णय घेतले जातीस तसेच कर्ज मर्यादा वाढवणे आणि पतसंस्थेचे सभासद वाढविण्यावर भर दिला जाईल, असे आश्वासन दिले. यावेळी ज्येष्ठ सभासद किरण गुरव, अंबादास जाधव, प्रकाश खलसे, बळीराम घोरपडे आणि नवनिर्वाचित सभासद रुपेश पवार, ऋषीकेश वाघ, संतोष कोरे, मयुर विस्ते, रोशन गायकर, मंगेश आहिरे, चेतन सानप, आदी उपस्थित होते.यावेळी नुतन अध्यक्ष बाबासाहेब गिते यांचा सत्कार निवडणुक निर्णय अधिकारी निळकंठ सावंत व




श्री.प्रकाश खलसे व व्हा.चेअरमन श्री.तानाजी जगताप यांचा सत्कार श्री.बळीराम घोरपडे यांच्या हस्ते करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच निवडणुक निर्णय अधिकारी श्री.निळकंठ सावंत यांचा सत्कार सुरेश सोनवणे यांनी केला.

# नाशिक जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या वतीने दिंडोरी तहसीलदारांना निवेदन






नाशिक राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जात नसल्याने व त्याबाबत वारंवार आश्वासन देऊनही आश्वासित मागण्यावर निर्णयांची अंमलबजावणी होत नसल्याने राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक नाराज आहेत.आपण पदभार घेतल्यापासून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकदाही स्वतंत्र बैठक घेतली नाही व समस्यांचे निराकरणही केले नाही.त्यामुळे दि.१७ मार्च रोजी राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक राज्यातील प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार / जिल्ह्यात जिल्हाधिकारी तसेच राज्याचे शिक्षण आयुक्त यांना त्यांच्या कार्यालया समोर आंदोलन करनार आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना दिंडोरी तालुका कार्यकारिणी तसेच सदस्यांकडून देण्यात आले. निवेदनात विविध मागण्या करण्यात असून त्यामध्ये प्रामुख्याने १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अर्धवेळ,विना तसेच अंशतःअनुदानावरील नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी व सेवानिवृत्तांना या योजनेचा तातडीने लाभ द्यावा,१नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी राज्यातील अंशतः अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ देण्यात यावी. जाहीर केलेले अनुदान त्वरित देण्यात यावे,मान्यताप्राप्त आय टी शिक्षकांच्या समायोजनाबाबतचा शासनादेश त्वरित निर्गमित करण्यात यावा,शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १०,२०,३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना त्वरित लागू करावी, निवडश्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी,प्रलंबित वाढीव पदांचे समायोजन त्वरित करावे,विनाअनुदानित सेवेत असलेल्या शिक्षकांची अनुदानितकडे बदली करून त्यांच्या प्रस्तावास शिक्षण उपसंचालकांनी त्वरित मान्यता द्यावी,संचालक कार्यालयात त्रुटी पूर्तता केलेल्या प्रलंबित वाढीव पदाच्या फाईल्स त्वरित मंत्रालयात मागवून त्या पदांना मान्यता देऊन त्यांच्या समयोजनाचे त्वरित आदेश द्यावेत,सद्यस्थितीत कनिष्ठ महाविद्यालयाच्या तुकडी मान्यतेसाठी शाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात २१ विद्यार्थी व वरिष्ठ महाविद्यालय संलग्नितमध्ये ३१ विद्यार्थी ग्राह्य धरावेत,एम.फिल.,एम.एड., पीएच.डी. धारक कमवि शिक्षकांना उच्च शिक्षणातील शिक्षकांप्रमाणे वेतन वाढ लागू करावी,निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, / योजना लागू केलेल्या शिक्षकांना हिशोब व देय रक्कम देण्यात यावी, वेतन आयोगाचे थकित हप्ते त्वरित द्यावेत, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा कार्यभार सतत तीन वर्षे कमी झाला, शून्य झाला तरच अतिरिक्त घोषित करावे,अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयातील अंशकालीन घड्याळी तासावरील शिक्षकांना शासकीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे मानधन द्यावे,कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्यांना पदोन्नतीची वेतनवाढ देण्यात यावी.,अर्धवेळ शिक्षक पूर्णवेळ झाल्यावर त्यांच्या अर्धवेळ सेवेचा कालावधी वेतनवाढ व इतर लाभांसाठी ग्राह्य धरण्यात यावा.,अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया बंद करावी,शिक्षकांची सर्व रिक्त पदे त्वरित भरावीत,शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार दूर करावा. अशा मागण्या करण्यात आल्या आहे. यावेळी जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे सह कार्याध्यक्ष प्रा.शिवाजी कदम जिल्हा संघटक प्रा.संतोष उफाडे , खजिनदार प्रा.हेमंत घडवजे,तसेच तालुक्यातील शिक्षक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक विदर्भ सत्यजीत साहित्यनंद

# २० वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर उत्साहात संपन्न




नाशिक देवळा तालुक्यातील महाल पाटणे येथील लोकनेते व्यंकटराव हिरे माध्यमिक विद्यालयाच्या सन२००३-४ च्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर कार्यक्रम तब्बल वीस वर्षांनंतर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मालेगाव तालुक्यातील चिंचावड येथील नव्याने सुरू झालेल्या निम व्हॅली हॉटेल व रिसॉर्ट येथे रविवार दि.१६ मार्च रोजी हा आगळावेगळा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे विशेष आयोजन सुनील बेलदार यांनी केले होते.अनेक वर्षांनी आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटण्याची संधी मिळाल्यामुळे उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.एकमेकांना पाहताच सर्वजण भावूक होऊन गळाभेट घेत होते.यावेळी शिक्षकांचा सन्मान आणि जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला.या कार्यक्रमाला विद्यालयातील जेष्ठ शिक्षक शरद शेवाळे,श्रीराम निकम व शिपाई राजेंद्र ठाकरे हे देखील उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजनांचा शाल,श्रीफळ देऊन विशेष सत्कार केला.शरद शेवाळे यांचा सत्कार मनीषा बापू चव्हाण आणि ज्योती भरत खैरनार यांनी केला.श्रीराम निकम यांचा सत्कार सुरेखा बाळू काकुळते आणि रत्ना रामदास अहिरे यांनी केला तर राजेंद्र ठाकरे यांचा सत्कार प्रतिभा रामकृष्ण काळे आणि भारती कारभारी पवार यांनी केला. शिक्षकांनी देखील आपल्या जुन्या विद्यार्थ्यांविषयी आठवणी सांगताना विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम व्यक्त केले.अरुण शेलार,दिनेश सस्ते आणि मनीषा बापू चव्हाण यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत शिक्षकांचे आभार मानले.सुनील बेलदार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.सर्वांसाठी वेलकम ड्रिंक,स्वादिष्ट नाश्ता आणि उत्कृष्ट जेवण यांची विशेष सोय करण्यात आली होती.म्युझिक सिस्टीमच्या तालावर सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला.विद्यार्थ्यांनी शिक्षकांसोबत गप्पागोष्टी आणि नाचगाण्यांचा आस्वाद घेत, जुन्या



आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नीम व्हॅली रिसॉर्टच्या व्यवस्थापकांचा शरद शेवाळे यांच्या हस्ते शाल,श्रीफळ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.तसेच म्युझिक सिस्टीम चालकांचा देखील यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकमुखी निर्णय घेतला की,दरवर्षी संपूर्ण कुटुंबासह असाच गेट-टुगेदर आयोजित केला जाईल.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व माजी विद्यार्थ्यांनी सुनील बेलदार यांचे विशेष आभार मानले.

# श्री दिनेश खैरे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर




पुणे येथील शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य नामांकित महाविद्यालय नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी, साहित्यिक, कवी,श्री दिनेश ताराचंद खैरे. यांना पुणे येथील साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व पारसनाथ फाउंडेशनच्यावतीने देण्यात येणारा महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. मागील पंचवीस वर्षातील सामाजिक, शैक्षणिक ,क्रीडा, आणि साहित्य निर्मिती, प्रबोधन, जनजागृती, या विविध क्षेत्रातील योगदानाची दखल घेत श्री दिनेश खैरे.यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे निवड समितीने जाहीर केले आहे.




अत्यंत प्रतिष्ठित समजला जाणारा महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार श्री दिनेश ताराचंद खैरे. यांना दिनांक २३ मार्च २०२५ रोजी पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळ १३२१ पुणे. येथे ११ वाजता रोजीआयोजित पुरस्कार वितरण सोहळयात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार श्री दिनेश खैरे यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुणे येथील साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व पारसनाथ फाउंडेशनच्या वतीने श्री दिनेश



खैरे यांना पाठवण्यात आलेल्या निवड पत्रात असे नमूद करण्यात आले आहे. की देशाच्या प्रगतीसाठी व राष्ट्राच्या हितासाठी सामाजिक उज्वल भविष्यासाठी आपण अनेक क्षेत्रात गेल्या काही वर्षातील आपण केलेल्या सामाजिक, शैक्षणिक,साहित्य निर्मिती, कार्याची सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन आम्ही साऊ ज्योती सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य व पारसनाथ फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आपल्या कार्य कर्तुत्वाला प्रोत्साहित करण्याचे कार्य करीत आहोत. पुरस्कार प्रेरणा देतात आणि प्रेरणेने राष्ट्र मोठे होते. या सूत्रावर आधारित महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२५ आपणास प्रोत्साहित करण्याच्या हेतूने आम्ही वरील फाउंडेशनच्या माध्यमातून २०२५ करिता आपणास हा पुरस्कार जाहीर करीत आहोत. तसेच भावी वाटचालीसाठी शुभेच्छा. आपणास तरी आपण या समारोह प्रसंगी आपण आपल्या सहकुटुंब व मित्र परिवारासह सोबत उपस्थित राहून सदर कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती असेही पत्रात नमूद करण्यात आले असून त्यांना मिळालेल्या या महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक विदर्भ सत्यजीत अध्यात्म सागर

# 'कंटेनर'मधून जनावरांची तस्करी : तीन आरोपींना अटक ; ६० गोवंशाची सुटका




पांढरकवडा :उपविभागात गोवंश तस्करीविरोधात मोठी कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळच्या पथकाने अवैधरीत्या कत्तलीसाठी गोवंश वाहतूक करणाऱ्या तिघांना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल ६० गोवंश (बैल) आणि एक कंटेनरसह एकूण ४५ लाख ७ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई १७ मार्च २०२५ रोजी करण्यात आली. गोपनीय माहितीवरुन टाकला सापळा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक १७ मार्च रोजी पांढरकवडा उपविभागातील अवैध धंद्यांविरुद्ध आणि उघड गुन्ह्यांचे अन्वेषण करण्याच्या दृष्टीने गस्त घालत असताना पथकाला खात्रीलायक गोपनीय माहिती मिळाली. नागपूर येथून एक कंटेनर वाहनातून गोवंशीय बैल कत्तलीसाठी पांढरकवडा मार्गे हैदराबाद येथे वाहतूक होणार असल्याचे समजले. ही माहिती मिळताच पथकाने तातडीने पंचासह पांढरकवडा पोलीस स्टेशन हद्दीतील पिंपरी गावाजवळ सापळा लावला. काही वेळातच नागपूरकडून संशयास्पदरीत्या येणारा कंटेनर क्र. टी एस ०७ यु ई ७०२१ दिसताच पोलिसांनी त्याला थांबवले. वाहनाची पाहणी केली असता त्यात कोंबून ठेवलेले ६० गोवंशीय बैल आढळून आले. आरोपींची नावे आणि अटक वाहनातील तिघांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी बैल हैद्राबाद येथे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे संतोष भरलाल लोधा वय ७१ वर्ष, रा. फुलपुरा, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश मशीद अली रशीद अली २८ वर्ष, रा. दांडीयावाडी, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश शाकीर अली अमानत अली ७० वर्ष, रा. दांडीयावाडी, ता. सारंगपूर, जि. राजगड, मध्यप्रदेश मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्तपोलिसांनी पंचासमक्ष वाहनाची आणि आरोपींची झडती घेतली असता खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला:तीन मोबाईल फोन किंमत अंदाजे ३,००० रुपयेरोख रक्कम २,२०० रुपये ६० गोवंश बैल किंमत अंदाजे १५,००,००० रुपयेकंटेनर वाहन किंमत अंदाजे ३०,००,००० रुपये)असा एकूण




४५,०७,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कायदेशीर कारवाई या प्रकरणी आरोपींविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६, तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला असून आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, तसेच स्थानीय गुन्हे शाखा यवतमाळचे पोलीस निरीक्षक सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान सहायक पोलीस निरीक्षक अजयकुमार वाढवे, पोउपनि धनराज हाके, पोलीस अंमलदार सुनिल खंडागळे, उल्हास कुरकुटे, सुधीर पांडे, निलेश निमकर, रजनीकांत मडावी, सलमान शेख, सतिश फुके यांनी परिश्रम घेऊन ही मोठी कारवाई यशस्वीरित्या पूर्ण केली. पुढील तपास सुरु सध्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ पोलीस करीत आहेत. या कारवाईमुळे गोवंश तस्करी करणाऱ्या टोळक्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# माळ पैकी तोरणवाडी - शिदवाडी रस्ताची दुरवस्था




शहापूर शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत माळ अंतर्गत तोरणवाडी ते शिदवाडी हे अंतर ३ किलोमीटरपाचशे ते सहाशे लोकवस्तीचे अवघ्या चार किमी अंतरावर असूनही या गावात जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. अतिशय खडतर प्रवास येथील लोकांच्या जणू पाचवीला पुजलेला असून यातुन सुटका होणारं कधी असा लोकांचा प्रश्न आहे. मुख्य रस्त्यावर येण्यासाठी शाळकरी विद्यार्थ्यांना चार किमीचा खडतर प्रवास पायी करावा लागत असुन त्या सध्या येथेजाण्या-येण्यासाठी कच्चा रस्ता आहे. रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असुन त्यावरून ये-जा करने त्रासदायक होते आहे. त्यामुळे शिदवाडी येथुन शालेय विद्यार्थी व गर्भवती महिला आजारी व्यक्ती, वृद्ध नागरिक यांना अतिशय त्रास होत आहे सदर रस्त्यावरून वाहन चालवणे कठीण होत असल्याने वाहतुकीची सोय नाही त्यामुळे विद्याथी / महिला / नागरिकांना कामानिमित्त इतर ठिकाणी नाव्यासान ऋतासाहून अधिक पायपीट करावी लागते. त्यामुळे बऱ्याच विद्याथ्यांनी अर्धवट शिक्षण सोडले आहे व आजारी व्यक्तींना उपचारविना राहावे लागत आहे. रस्ता



नसल्याने पाण्याचे टँकर वेळेवर येत नाही .कसाऱ्या शहरांपासून अवघ्या बारा किमी अंतरावर असलेल्या तोरणवाडी - शिदवाडी गावातील रस्त्याची अवस्था बिकट झाली असून असून मागील पाच ते सहा वर्षांपासून खराब रस्त्याच्या सामना करतांना रहिवाशी मेटाकुटीला आले आहेत. वैभव वाघ ग्रामस्थ माळ शिदवाडी.जन्मापासून रस्ता ही समस्या आम्हाला सतावत असून आता अजुन किती दिवस ही समस्या आम्हाला त्रस्त करणार आहे.दिनेश शिद ग्रामस्थ

# शिवाजी विद्यालय चातारी येथे यशवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व विद्यार्थी स्नेहसमेलन संपन्न




उमरखेड श्री शिवाजी विद्यालय चातारी येथे सन २००३-४ मध्ये ८ वर्ग पास झालेले माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्श गुरूच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकांचा सत्कार या स्नेहसंमेलना २०२५ दरम्यान केला. तसेच या यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा विद्यालयाकडून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष. सुरेशराव कदम तर प्रमुख मार्गदर्शक डॉ . विजयराव माने ,अँड अर्चनाताई माने,विश्वंभर वानखेडे, किशोर भारती, चिंचोलकर सर, शिवानंद बिच्चेवार,विजय लंकलवाड,प्रवीण सूर्यवंशी, मुख्याध्यापक हरी खोकले, उपस्थित होते. ७० वर्षापुर्वी ही शाळा ग्रामीण भागात शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी स्व. भाऊसाहेब माने यांनी स्थापन केली आणि आजही तीच भूमिका पार पाडत आहे. जेव्हा हे विद्यालय सुरू झाले, तेव्हा शिक्षण मिळवणे हेच एक मोठे आव्हान होते. आज सर्वत्र शिक्षणाची




सुविधा उपलब्ध आहे, पण तंत्रज्ञानाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धेत टिकून राहणे कठीण होत आहे, जग वेगाने बदलत आहे. सध्या स्पर्धेचे जग असून विद्यार्थ्यांना सर्वच क्षेत्रात स्पर्धा पार पाडावी लागते. स्पर्धेमध्ये विद्यार्थी टिकण्यासाठी कोडींग, रोबोटिक्स, ३ प्रिंटिंग, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता () या तंत्रज्ञानांमध्ये शालेय विद्यार्थांना देखील कौशल्य हस्तगत असणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे अनेक मोठ्या शहरांतील शाळा देखील अशा प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण देण्यात अपयशी ठरत आहेत. परंतु श्री शिवाजी विद्यालय आणि तेजमल गांधी विद्यालय यांच्या दूरदृष्टीमुळे, कोणत्याही मोठ्या शासकीय आर्थिक पाठबळाशिवाय, अशा स्टीम प्रयोगशाळा आपल्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मत डॉ. विजयराव माने यांनी आपल्या प्रमुख मागदर्शनातुन व्यक्त केले. या प्रयोगशाळेत विद्यार्थी प्रत्यक्ष कोडींग शिकतील, रोबोट तयार करतील, नवनवीन प्रकल्पांवर काम करतील आणि आधुनिक जगाच्या मागण्यांसाठी स्वतःला तयार करू भविष्यात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करतांना या बालवयात हस्तगत केलेल्या तांत्रिक कौशल्याचा मजबूत पाया निश्चितच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये यश संपादन करण्यास मदत होईल, यामुळे भविष्यात त्यांना मोठ्या शहरांत शिक्षण व नोकरीच्या आणि रोजगाराच्या चांगल्या संधी मिळवण्यासाठी मदत होईल.तसेच हा बदल घडवण्यासाठी सर्वच माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याची गरज असल्याने माजी विद्यार्थी म्हणून यात योगदान देऊन आर्थिक मदत, मार्गदर्शन, किंवा शक्य असेल त्या सेवा उपलब्ध करून देण्याची व कोणत्याही स्वरूपात त्यांनी सहभाग घ्यावा व या परिवर्तनात सामील होण्याचे आव्हान डॉ. माने यांनी या वेळी केले. या प्रसंगी ४० ते ४५ माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लाऊन यापैकी धनश्री बरडे, सारीका माने, वैजयन्ती कदम, प्रियका गांवडे, राम कदम, मनिषा सुर्यवंशी यांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केल्या कार्यक्रमाचे संचलन जीवन रणविर यांनी प्रास्ताविक राम कदम.यांनी तर सर्वांचे आभार अभिजित देवसरकर यांनी मांडले=================

श्री शिवाजी विद्यालय चातारी व तेजमाल गांधी विद्यालय ब्राह्मणगाव येथील शालेय विद्यार्थ्यांना भविष्यात स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी कोडींग रोबोटिक्स, ३ प्रिटींग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ( ) च्या प्रयोगशाळा उभारून तंत्रज्ञानाचे कौशल्य हस्तगत होणार''.

**डॉक्टर विजय माने ***

**चेअरमन श्री शिवाजी माध्यमिक आणि कनिष्ठ विद्यालय.**

# जिल्हा परिषदेचा लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक अर्थसंकल्प सादर




शहापूर ठाणे ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणासाठी अर्थसंकल्प - मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे ठाणे जिल्हा परिषदेचा २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प आज मंगळवार, दि. १८ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात सादर करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडे अर्थसंकल्प सादर करण्यासाठी अर्थसंकल्पाची प्रत यावेळी प्रदान केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी जिल्हा परिषदेचा १०८. १३ कोटीं रुपयाचा अर्थसंकल्प सादर करताना लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक अर्थसंकल्प आहे असे प्रतिपादन केले. जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प लोकाभिमुख असल्याचे सांगताना मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करून जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींची माहिती, कुटुंब प्रमुख, आर्थिक स्थिती तसेच आवश्यकता लक्षात घेऊन २६ योजना तयार करण्यात आला आहेत. तसेच ग्रामपंचायत विभाग अंतर्गत घरपोच सोईसुविधा पोहोचवण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र तसेच ऑनलाईन शासकीय दाखले देण्यासाठी अपमार्फत कामकाज करण्यात येणार आहे. कृषी विभाग व पशूसंवर्धन विभाग अंतर्गत शेतकरी व पशुपालकांचे उत्पन्न वाढीसाठी प्रत्यक्षरीत्या काम करण्यात येणार आहे. शासकीय कामकाजातील अडथळा कमी करण्यासाठी तसेच नियोजनबद्ध काम करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागांतर्गत वेब पोर्टल तयार करण्यात येणार असून प्रत्येक कर्मचारी- अधिकाऱ्यांची ऑनलाईन माहिती पोर्टलवर उपलब्ध असेल. जेणेकरून मेडिकल बिल, पेन्शन, सेवार्थ लाभ देण्यासाठी सुलभ असेल. रोगनिदान चाचण्या ई संजीवनी कार्यक्रम दिव्यांगाना सार्वजनिक इमारती सुगम्य करणे इत्यादी लोकाभिमुख कार्यक्रम राबविताना वैद्यकीय प्रतिकृती देयक, भविष्य निर्वाह निधी, मालमत्ता नोंदणी, कामवाटप इत्यादींची संगणकीय प्रणाली निर्माण करून पारदर्शक व गतिमान कार्य करण्याचे यावेळी आश्वासित केले आहे. जिल्हा परिषदेचे स्व उत्पन्न वाढ करण्यासाठी मालमत्ता रजिस्ट्रेशन पोर्टल तयार करण्यात येणार आहे. सीएसआर फंड कोट्य वधी रुपये असून त्याचे नियोजन योग्यरीत्या करण्यासाठी सी. एस. आर. फंड साठी वेब पोर्टल तयार करून मदत करणाऱ्या सामाजिक संस्था यांना फंडची आवश्यकता लक्षात आणून देण्याचे काम या पोर्टल मार्फत करण्यात येईल तसेच आवश्यक त्या ठिकाणी सी. एस. आर फंड वापरण्याचे नियोजन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल. ग्रामीण भागामध्ये शिक्षण, आरोग्य व महिला बालकल्याण या तीन विभागातील योजना योग्य पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. उत्पन्न वाढीसाठी जिल्हा



परिषदेद्वारे योग्य गुंतवणूक व्यवस्थापन करण्यात आल्याने उत्पन्नामध्ये दहा कोटींची भरीव वाढ करण्यात आली आहे. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी राबविण्यात आलेल्या दिशा कार्यक्रमाची दखल राज्य शासनाद्धारे घेण्यात आली असून दिशा कार्यक्रम राज्यस्तरावर राबवला जाणार आहे. तर ठाणे जिल्हा परिषदेची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. शैक्षणिक गुणवत्ता तसेच भौतिक सुधारण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेचे देखभाल दुरुस्ती करण्याचे कामकाज देखील करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषद निधीमध्ये स्वउत्पन्नासह राज्य, केंद्र शासन व इतर यंत्रणांकडून निधी प्राप्त होत असतो. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेचे स्व उत्पन्न अंतर्गत अर्थसंकल्प हा पूरक प्रकारचा असून सर्व विभागांना त्या अनुषंगाने निधी वाटप करण्यात आलेला आहे. या योजना राबवताना इव्हिडन्स बेस्ड पॉलिसी मेकिंग व क्लस्टर डेव्हलपमेंट या धोरणाचा समावेश करण्यात आलेला असून सन २०२५- २६ चा अर्थसंकल्प त्यास दिशा देणारा आहे. जिल्हा परिषद, ठाणे सन २०२५-२६ यावर्षीचा रक्कम रु १०८.१३ कोटींचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यामध्ये शिक्षण विभाग १.६५ कोटी, इमारत व दळणवळण ११.८२ कोटी, कृषी ३.८३ कोटी ,पशुसंवर्धन ३.८७ कोटी, आरोग्य ३.८४ कोटी , ग्रामपंचायत मुद्रांक हिस्सा ३२.५० कोटी , लघु पाटबंधारे २.२१ कोटी आणि पाणीपुरवठा ३.६४ कोटी निधी एवढा मंजुर करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी माहिती दिली आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत / स्वच्छ भारत मिशन प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कार्यकारी अभियंता बांधकाम/ पाणीपुरवठा संदिप चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहीतुले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास संजय बागुल, जिल्हा कृषी अधिकारी एम. एम. बाचोटीकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी दिलीप जोकार तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी- कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.